दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १९४ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१६ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# काँग्रेससाठी जाहीरनामा म्हणजे केवळ कागद-देवेंद्र फडणवीस

## भाजपचा जाहीरनामा म्हणजे आमच्यासाठी मोदींची गॅरंटी

नागपूर (वृत्तसंस्था)-भाजपाचे संकल्प पत्र नाही तर मोदींची गॅरंटी आहे. नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर काय करायचे ते संकल्पपत्रात मांडण्यात आले आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली.काँग्रेसचा जाहीरनामा फेल आहे. ते कधीच आश्वासने पूर्ण करीत नाही. काँग्रेससाठी जाहीरनामा कागद आहे. आमच्यासाठी मोदींची गॅरंटी आहे, अशी टीका फडणवीसांनी केली आहे. छत्तीसगढ, राजस्थान, कर्नाटक आदी काँग्रेसशासीत राज्यांमध्ये त्यांनी जाहीरनाम्यात दिलेले एकही आश्वासन पूर्ण केले नाही. तर भाजपाने २०१९ च्या संकल्पपत्रात दिलेली ७५ आश्वासने पूर्ण केलेली आहे, याकडे फडणवीस यांनी लक्ष वेधले आहे.



अग्निवीर रद्द करणे म्हणजे देश धोक्यात टाकणे आहे. सैन्याची ही योजना आहे. या संकल्पपत्रामुळे रोजगार आणि नोकरीच्या अनेक संधी निर्माण होणार आहे. गुणवत्तापूर्ण विकासावर यात भर देण्यात आला आहे. पुढची पाच वर्ष ८० कोटी नागरिकांना रेशन मोफत देण्याचा संकल्प आहे अशी माहिती फडणवीस यांनी दिली. सिलेंडर कालबाह्य करुन पाईपने गॅस देण्याचा निर्धार आहे. एक कोटी घरांना सोलरची सयंत्र देऊन त्याचे विजेच बील मोफत करणार आहे. मुद्रा योजनेत ६० टक्के महिलांना त्याचा लाभ मिळाला आहे. मुद्रा योजनेची कर्ज मर्यादा २० लाख करणार आहे. भाजीपाला उत्पादन वाढवण्यासाठी त्यांच्या साठवणुकीसाठी प्रयत्न करणार आहे. नैसर्गिक शेतीचा विस्तार करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम आखण्यात आला आहे. पीकवीमा योजना अधिक सक्षम करण्यात येणार आहे. पाच प्रमुख पिकांच्या एमएसपीमध्ये भरघोस वाढ करण्यात आली आहे.




फळे आणि भाज्या टिकवण्यासाठी अधिक उपाययोजना करण्यात येणार आहे. देशात पहिल्यांदात कृषी सॅटेलाईट प्रक्षेपीत करण्यात येणार आहे. महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात शक्ती डेस्क स्थापन करण्यात येणार आहे, असे फडणवीस म्हणाले.

# तपासणी पथकाकडून ११ लाखाची रोकड जप्त

**गडचिरोली । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुक आचारसंहितेच्या काळात गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी नेमण्यात आलेल्या तपासणी पथकाद्वारे काल रात्री दोन प्रकरणात एकूण ११ लाख १०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

जिल्ह्यात १६ मार्च पासून लोकसभा निवडणूक प्रक्रिया पुर्ण होण्याच्या तारखेपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू असून व्हिडिओ सर्वेक्षण पथक, भरारी पथक, स्थिर सर्वेक्षण पथकाद्वारे विविध ठिकाणी तपासणी करण्यात येत आहे.



भरारी पथक क्रमांक १२६८०१ यांना १४ एप्रिल रोजी रात्रो ९.३० वाजता शासकीय विज्ञान महाविद्यालय गडचिरोली जवळील, महादेव मंदीराचे समोर नाकाबंदी दरम्यान एक पांढऱ्या रंगाची व्हेन्यु हुडाई कंपनीचे चारचाकी वाहनात रोख रक्कम असलेली बॅग आढळून आली. याबाबत वाहनचालकाला समाधानकारक उत्तरे देता न आल्याने पोलीस निरीक्षक अरुण फेगडे यांच्या निर्देशानुसार भरारी पथक प्रमुख खेमराज लेगनुरे यांनी सदर रकम जप्त केली. पंचासमक्ष वाहनाच्या मागील सीटवर असणाऱ्या काळया बॅग उघुन पाहणी केली असता, सदर बॅगमध्ये एकूण १० लाख १०० रुपये आढळले. सदर रकम जप्त करुन वाहनचालकास जप्ती पावती देण्यात आली. व सदर रक्कमेबाबत असणाऱ्या आर्थिक उलाढालीचे कागदपत्रे समक्ष प्राधिकाऱ्यांकडे हजर करण्याबाबत सुचना देण्यात आली.


यानंतर लगेचच याच ठिकाणी रात्रो ९.५० वाजताचे सुमारास एक पांढऱ्या रंगाची फोर्ड कंपनीचे चारचाकी वाहनाचे समोरील डिक्कीत एक लाख रुपये रोख रक्कम आढळून आली. सदर रकम घराचे बांधकामाकरिता भाऊकडून आणली असल्याचे सांगण्यात आले. परंतु सदर रोख रक्कम बाबत खात्री करणे गरजेचे असल्याने भरारी पथकाद्वारे सदर रकम जप्त करून आर्थिक उलाढालीचे कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.वरील दोन्ही प्रकरणात तपास सुरु असल्याची माहिती आदर्श आचारसंहिता समितीचे नोडल अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार यांनी दिली आहे.

# निवडणुकीसाठी नियुक्त सूक्ष्म निरीक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

**गडचिरोली । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक निर्भय, शांततापूर्ण आणि पारदर्शक पध्दतीने होण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सूक्ष्म निरीक्षकांचे (मायक्रो ऑब्झर्व्हर) प्रशिक्षण आज पार पडले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झालेल्या प्रशिक्षणाला निवडणूक निरीक्षक राहुल कुमार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी विवेक घोडके, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटील, नोडल अधिकारी प्रशांत शिर्के आदी उपस्थित होते.प्रशिक्षणात मतदान आणि मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी त्यामध्ये येणाऱ्या अडी-अडचणींचे निराकरण, मॉकपोल पध्दती, सूक्ष्म निरीक्षक आणि इतर अधिकारी यांच्यातील समन्वय, मतदारांना मतदान करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य आदि बाबींचे मार्गदर्शन करण्यात आले.




मतमोजणी केंद्राची मांडणी व नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, सूक्ष्म निरीक्षकांचे कार्य, संनियंत्रण पद्धती, अडचणी आल्यास करावयाच्या उपाययोजना अशा अनेक विषयांवर संगणकीय सादरीकरणाद्वारे निवडणूक निरीक्षक राहुल कुमार यांनी सविस्तर मार्गदर्शन करण्यात केले.प्रशिक्षणास निवडणूक कामासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ.आंबेडकरांचे कार्य देशाच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेत महत्त्वाचे- डॉ.शैलेंद्र लेन्डे

## महामानव डॉ. आंबेडकर यांच्या महत्वपुर्ण ग्रंथाच्या प्रदर्शनीचे उद्घाटन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

बाबासाहेबांचा कालखंड नकाराचा, अभावाचा, वंचित, उपेक्षितपणाचा आणि यातनांचा होता. बाबासाहेबांच्या कृतीमध्ये आधुनिक भारताच्या पुन:निर्मितीची तत्वे आहेत. त्यांच्या भावना, संवेदना, कल्पना आणि विचार नवदृष्टी देणारे असून बाबासाहेबांचे संपूर्ण कार्य देशाच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेत अतिशय महत्त्वाचे ठरले आहे. असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख तथा प्रमुख वक्ते डॉ. शैलेंद्र लेन्डे यांनी केले.

गोंडवाना विद्यापीठ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची केलेली पुनर्रचना या विषयावर परीसंवादाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे होते. व्यासपीठावर प्रमुख वक्ते डॉ. शैलेंद्र लेंडे, तसेच कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप बारसागडे, व्यवस्थापन परीषदेचे सदस्य डॉ. प्रशांत मोहीते उपस्थित होते.

डॉ. शैलेंद्र लेन्डे म्हणाले, डॉ. बाबासाहेबांचे कार्य लोकांच्या मनापर्यंत पोहोचले आहे. बाबासाहेब केवळ गीतकारांसाठी, लोककवींसाठी प्रेरणा नाही, तर संपूर्ण भारताच्या एकंदरीत भावना, विचार, संवेदना



आणि कल्पना या सगळ्या घटकांना बदलविणारे युगपुरुष आहेत. बाबासाहेब घटनेचे शिल्पकार आहेत. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्यायाचा आणि विवेकाचा वसा दिला आहे. या वसाच्या आधारावर जगाचे नवनिर्माण झाले आहे. त्या विचारांना समजून घेत स्वतःला पुढे आणण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

डॉ. आंबेडकरांचा कालखंड हा नकाराचा, अभावाचा, यातनांचा व अंधाराचा होता. अशा नकाराला व अंधाराला दूर करण्याचे कार्य या महामानवाने केले. डॉ. बाबासाहेबांच्या सर्व लेखनाचा चिंतनाचा, मंथनाचा गाभा विचारशीलता आहे. अस्पृश्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी १९२० मध्ये मूकनायक पाक्षिक काढले ही त्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे. तसेच महाड चवदार तळ्याच्या आंदोलनातून दलितांच्या न्याय हक्कासाठी पुढे आले. बाबासाहेबांनी दलितांच्या मुक्ती लढ्यापासून कार्याला सुरुवात केली. गुलाम असणाऱ्या घटकाला मुक्त करणे हा त्यांच्या कार्याचा गाभा राहिला आहे. असेही ते म्हणाले.अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे म्हणाले, स्वतंत्र भारताची सार्वभौम राज्यघटना लिहून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटनेचे शिल्पकार ठरले. डॉ.आंबेडकरांनी समाजातील वंचित, शोषित, पीडित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून भावी पिढीपर्यंत त्यांचे कार्य व विचार पोहोचविण्याची गरज असून त्यांच्या जयंतीनिमीत्त महामानवाने केलेल्या कार्याला ऊजाळा देण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे प्रमुख दिलीप बारसागडे यांनी केले. संचालन प्रा. डॉ. हेमराज निखाडे यांनी तर आभार कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी मानले. प्रारंभी कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तदनंतर सुप्रसिद्ध गायक प्रफुल्ल सांगोडे यांनी भारतीय घटनेचा तु शिल्पकार हे अभिवादन गीत गायले.याप्रसंगी कार्यक्रमाला विविध विभागाचे विभाग प्रमुख विद्यापीठातील प्राध्यापक, सहा. प्राध्यापक व परिसरातील मान्यवर मंडळी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप बारसागडे लिखीत इ.ठ.-ालशवज्ञरी - ऊीळींळलरश्र ीींीवू या पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमीत्त निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक जनसंवाद विभागाचा विद्यार्थी सुरज दहागांवकर, द्वितीय क्रमांक रसायनशास्त्र विभागाची विद्यार्थीनी प्रिया मुरकुटे तर तृतीय क्रमांक भौतिकशास्त्र विभागाचा विद्यार्थी मार्शल उराडे यांनी पटकाविला. तर चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक रसायनशास्त्र विभागाची विद्यार्थीनी प्रियंका विश्वास, द्वितीय क्रमांक उपयोजित अर्थशास्त्र विभागाचा विद्यार्थी दुणेय किरमीरवार तर तृतीय क्रमांक इंग्रजी विभागाची विद्यार्थीनी सोनाली टोकलवार हिने पटकाविला. या स्पर्धेमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, रोख व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करू नये...चंद्रपूर पोलिसांची करडी नजर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सध्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूक - २०२४ आदर्श आचारसंहिता सुरू आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्षातील उमेदवार उभे असून प्रचार सुरू आहे. या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर सोशल मिडीया व्हॉट्सप, फेसबुक, एक्स (ट्विटर) इत्यादी समाज माध्यमावर विविध प्रकारचे ऑडीओ/व्हिडीओ व इतर संदेश टाकण्यात येतात. तसेच अशा पोस्टवर इतर लोक लाईक व कॉमेन्टस् करून शेअर करतात. परंतु असे निदर्शनास आले आहे की, खोटया बातम्या प्रसारीत करणारे ऑडीओ/व्हिडीओ व संदेश सोशल मिडीयावर वायरल होत आहे.

तसेच काही इसम व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते जाणीवपूर्वक द्वेषबुध्दीने वरोधी उमेदवारांच्या वैयक्तिक आणि कुटुंबियांना लक्ष करून द्विअर्थी आक्षेपार्ह पोस्ट टाकत आहेत व अशा पोस्टला इतर लोक लाईक व त्यावर आक्षेपार्ह कॉमेन्टस् करून शेअर करीत आहे. यावरून चंद्रपुरात नुकताच आदर्श आचारसंहिता दरम्यान समाज माध्यमावर टाकलेल्या आक्षेपार्ह पोस्टमुळे समाजात तेढ निर्माण करून शांतता भंग केल्याप्रकरणी संबंधित इसमा विरुद्ध गुन्हा नोंदवून त्यास अटक करण्यात आलेली आहे.तरी, आपण आपले व्हॉट्सप, फेसबुक, एक्स (ट्विटर) व इतर सोशल मिडीयावर राजकीय पक्ष व उमेदवार बाबत वैयक्तिक व आक्षेपार्ह टिकाटिप्पणी तसेच धार्मिक भावना दुखविणा-या पोस्ट टाकू नये. कोणतेही व्हिडीओ, फोटो एडीट करून आक्षेपार्ह भासवून पोस्ट करु नये किंवा त्यास लाईक व कॉमेन्टस् करून अशा प्रकारच्या पोस्ट शेअर करू नये. सोशल मीडिया व इंटरनेटच्या माध्यमातून पोस्ट करतांना सामाजिक भान ठेवण्यात यावे. अन्यथा संबंधितांविरुध्द प्रचलित कायद्यान्वये कायदेशीर कठोर कारवाई करण्यात येईल.अशा प्रकारचे आक्षेपार्ह व्हिडीओ/ऑडीओ संदेश प्राप्त झाल्यास त्या-त्या समाज माध्यमावर रिपोर्ट करावे. किंवा त्याची माहिती त्वरीत नजीकच्या पोलिस स्टेशन किंवा सायबर पोलिस स्टेशन येथील ८८८८५११९११ या मोबाईल क्रमांकावर द्यावी. सोशल मिडीयावरील प्रत्येक पोस्ट वर चंद्रपूर जिल्हा पोलिस दलाचे बारकाईने लक्ष आहे, असे पोलिस दलाने कळविले आहे.

# आर.पी.आय चा काँग्रेस वा इतर कोणत्याही पक्षाला पाठिंबा नाही - सिद्धार्थ सुमन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (संस्थापक :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर )चे नेते दिवंगत दादासाहेब गवई हे नेहमी काँगेसला सपोर्टेड राहिलेले आहेत. त्यामुळे रिपब्लीकन मतदारांना काँग्रेसचा पारंपारिक मतदार म्हणुन गृहीत धरण्यात येते. परंतु या निवडणुकीत रिपाइंने काँग्रेस वा इतर कोणत्याही पक्षाला पाठिंबा दिलेला नाही. पक्षाचे सर्व पदाधिकारी कोणाच्याही प्रचारात सक्रीय नाहीत. त्यामुळे रिपब्लीकन मतदारांनी वा कार्यकर्त्यांनी याची नोद घ्यावी असे आवाहन रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीयाचे नागपुर प्रदेश सरचिटणीस सिध्दार्थ सुमन यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केलेले आहे.

विरोधक नेहमीच रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया हा काँग्रेसला शरणागत झालेला पक्ष आहे असा प्रचार करीत असतात. हा एकदम खोडसाळ आणी चुकीचा प्रचार आहे. शिवाय काँग्रेसही रिपब्लीकन मतदारांना गृहीत धरुत असते. रिपाइं काँग्रस सोबत राजकीय भुमिकेतुन तडजोड करित आलेली आहे. याचा अर्थ ती काँग्रेस सोबत असेलच असे नाही. १९ एप्रिल २४ ला लोकसभा निवडणुकीच्या होणाऱ्या मतदानात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने ने काँग्रेस वा इतर कोणत्याही पार्टी अथवा उमेदवारा पाठिंबा दिलेला नाही याची नोंद घ्यावी असे सिध्दार्थ सुमन यांनी प्रसिद्धी प्रत्रकाद्वारे कळवले आहे.


# जाणुया बरं, आवाज दिनाचा इतिहास!

**जागतिक आवाज दिन दरवर्षी १६ एप्रिल रोजी साजरा केला जातो. सर्व लोकांच्या दैनंदिन जीवनात आवाजाचे प्रचंड महत्त्व प्रदर्शित करणे हा या दिवसाचा उद्देश आहे. सन १९९९मध्ये ब्राझिलियन सोसायटी ऑफ लॅरींगोलॉजी अँड व्हॉईसने डॉ.नेडिओ स्टीफन यांच्या अध्यक्षतेखाली १६ एप्रिल हा दिवस पहिल्यांदा ब्राझिलियन व्हॉइस डे म्हणून साजरा केला. महत्त्वपूर्ण संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखातून वाचा... संपादक.**

आज १६ एप्रिल असून दरवर्षी आजच्या दिवशी जागतिक आवाज दिन- वर्ल्ड व्हाइस डे साजरा केला जातो. लोकांना त्यांच्या आवाजाचे महत्त्व समजावे यासाठी हा दिवस आयोजित केला जातो. खरं तर आपला आवाज हीच आपली ताकद असते. समाजात वावरत असताना आवाजामुळे आपली कामे सोप्पी होतात. परंतु काही लोकांना याचे महत्व समजत नाही आणि तंबाखू, धुम्रपान, ड्रग्ज आणि मोठमोठ्याने ओरडणे, अशा अनेक कारणांनी ते आपला बहुमूल्य आवाज गमवतात.

आवाज दिनाचा इतिहास- राष्ट्रीय आवाज दिन हा १९९९मध्ये सर्वप्रथम ब्राझीलमध्ये सुरु करण्यात आला. ब्राझीलमधील व्हॉईस हेल्थ प्रोफेशनल्सच्या गटाने या दिवसाची सुरुवात केली. दि.१६ एप्रिल १९९९ रोजी डॉ.नेडिओ स्टीफन यांच्या अध्यक्षतेखालील ब्राझिलियन सोसायटी ऑफ लॅरींगोलॉजी अँड व्हॉईसने हा दिवस ब्राझिलियन व्हॉइस डे म्हणून घोषित केला. यानंतर सन २००२मध्ये अमेरिकन अॅकॅडमी ऑफ ऑटोलॅरिन्गोलॉजिस्ट-हेड अँड नेक सर्जरीने हा दिवस जागतिक आवाज दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

महत्त्व आणि उद्दिष्ट्य- खरं तर आपला आवाज ही देवाने दिलेली अनोखी देणगी आहे आणि याच गोष्टीची जाणीव लोकांना व्हावी यासाठी जागतिक आवाज दिन साजरा करण्यास सुरुवात करण्यात आली. या दिवशी आरोग्याच्या महत्त्वाविषयी जनजागृती करण्यात येते. अनेक लोक दारू पिऊन, धुम्रपान करून, किंवा मोठमोठ्याने ओरडून आपल्या आवाजाचा चुकीचा वापर करतात. तर दुसरीकडे काही चांगल्या सवयी पाळल्या तर नक्कीच तुम्ही तुमच्या आवाजावर मात सुद्धा करू शकता. त्यामुळे आजच्या दिवशी अनेक डॉक्टर आणि संशोधक आवाजाशी संबंधित समस्यांवर काम करणाऱ्या लोकांशी चर्चा करून यावर मात करण्याचा प्रयत्न करत असतात. १६ एप्रिल हा जागतिक आवाज दिवस अर्थात वर्ल्ड व्हाइस डे म्हणून साजरा करण्यात येतो. आवाजाच्या बाबतीत अनेक गैरसमज लोकांना असतात. हे गैरसमज दूर होणे अत्यंत गरजेचे आहे. रोजच्या जगण्यात आवाजाकडे आपण तितकेसे लक्ष देत नाही. मात्र आवाजावर नक्की कसा ताण पडतो आणि त्याची काळजी घ्यायला हवी हेदेखील महत्त्वाचे आहे. आवाजाच्या बाबतीतल अनेक गैरसमज डॉ.शमा कोवळे, कन्सल्टंन्ट ईएनटी, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, मुंबई यांनी दूर केले आहेत आणि तुम्हालाही याबाब जाणून घेण्याची गरज सांगितली आहे.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

गैरसमज: १) कुजबुजणे चांगले असते कारण त्यामुळे तुमच्या आवाजाला जरा आराम मिळतो. सत्य: खरे तर कुजबुजल्यामुळे तुमच्या स्वर पटाचे- वोकल फोल्ड नुकसान होते. आवाजात कर्कशपणा असेल किंवा आवाज बदलत असेल तर कुजबुजल्यामुळे स्वर पटांवर ताण पडतो कारण ते पूर्णपणे जवळ नसतात त्यामुळे आवाज निर्माण करण्यासाठी अधिक जास्त जोर लावावा लागतो. त्यामुळे जर आवाजाला आराम द्यायचा असेल तर अजिबात बोलू नका. २) आपण आपल्या डायाफ्रामपासून गातो. सत्य: आपण आपल्या श्वासाच्या मदतीने गातो. तुमचा श्वास जितका चांगला असेल तितके चांगले तुम्ही गाऊ शकता. तुमच्या डायाफ्रामपासून गा असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा त्याचा अर्थ होतो की ओटीपोटात श्वास घेऊन गा आणि श्वास गाण्यास मदत करतो. ३) जर आवाज बसला असेल तर चोखून खाण्याच्या गोळ्या किंवा कफ ड्रॉप घेतल्यास बरे वाटते. सत्य: चोखून खाण्याच्या गोळ्या, मेंथलेंटेड कफ ड्रॉप्स हे तुमच्या आवाजासाठी हानिकारक असतात. मेंथॉलमुळे वेदना तात्पुरत्या थांबतात आणि आराम मिळाल्यासारखे वाटते, त्यामुळे खरेतर आवाज बसलेला असताना देखील तुम्ही बोलू लागता, अशाने आवाजाला अधिक जास्त त्रास होतो. दुसरे म्हणजे चोखून खाण्याच्या गोळ्यांमधील साखर घसा कोरडा करते, त्यामुळे बोलायला अजून सोपे जाते. ४) आवाजाला काही त्रास होत असेल, तर तो दूर होईपर्यंत थांबा. सत्य: आवाजाला काही त्रास होत असेल किंवा आवाज बदलला असेल तर आवाजाला थोडा आराम मिळण्यासाठी एक आठवडाभर वाट पाहणे ठीक आहे. त्यानंतर देखील आवाजात काही सुधारणा होत नसेल तर लॅरीन्गओलॉजिस्ट किंवा ईएनटी सर्जनला दाखवावे. ते तुमच्या स्थितीचे नेमके निदान करतील आणि त्यानुसार उपचार करतील. ४) जर आवाज बसला असेल तर चहामध्ये मध व लिंबू मिसळून किंवा व्हिस्की, गरम पाणी, साखर, लिंबू मिसळून प्यावे. सत्य: स्वर पटांना ओलसर ठेवायचे असेल तर पाणी हा एकमेव उपाय आहे. वर उल्लेख केलेली पेये ॲसिडिक आहेत, त्यामुळे आम्लपित्ताचा त्रास होऊ शकतो, जो आवाजासाठी अजून जास्त हानिकारक आहे. त्यामुळे आवाजाचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. जर आवाज बसला असेल तर पाण्याखेरीज इतर कोणतेही पेय पिणे टाळणे उत्तम. ५) बिटाडाईनने गुळण्या केल्यास आवाज बरा व्हायला मदत होते. सत्य: गुळण्या घशाच्या पोकळीत केल्या जातात. ते स्वरयंत्रात असलेल्या कंठातील पोकळीपर्यंत किंवा स्वर पटापर्यंत पोहोचत नाही, त्यामुळे त्याचा काहीही उपयोग होत नाही. ६) वेपिंग हे तुमच्या आवाजासाठी धुम्रपानाइतके वाईट नाही. सत्य: वेपिंग किंवा ई-सिगारेट या तुमच्या फुफ्फुसांसाठी तितक्याच हानिकारक असतात. जर त्याचा विपरीत परिणाम तुमच्या श्वासावर होत असेल तर आवाज आणि गाण्यावर देखील त्याचा परिणाम होणार हे नक्की. धुम्रपानामुळे व्होकल फोल्ड एडेमा किंवा रेन्के एडेमा होतो, तसेच कर्करोग होण्याची शक्यता असते. ७) कफ असेल तर घसा साफ करणे चांगले असते. सत्य: घसा साफ केल्याने स्वर पटांवर खूप ताण पडतो आणि आवाजाचे नुकसान होते. जर तुम्हाला घसा साफ करावासा वाटत असेल, तर एक घोट पाणी प्या किंवा कफ गिळण्याचा प्रयत्न करा. ८) गाताना डोक्यातून आवाज येतो. सत्य: आवाज आपल्या स्वर पटांमध्ये निर्माण केला जातो, आणि अशी काही चेंबर्स असतात जिथे आवाज प्रतिध्वनीत होतो. त्यामुळे गायकाला असे वाटते की आवाज डोक्यामध्ये घुमत आहे, याला हेड रजिस्टर म्हणतात. ९) आवाजाची काही समस्या असेल तर शस्त्रक्रिया हा त्यावरील एकमेव उपाय आहे. सत्य: आवाजाला काही त्रास होत असेल तर फुल टाईम स्पेशालिटी सिस्टिम असलेल्या रुग्णालयातील लॅरीन्गओलॉजिस्ट किंवा ईएनटी सर्जनला दाखवा, ते तुमच्या समस्येचे नेमके निदान करतील आणि त्यानुसार थेरपी किंवा शस्त्रक्रिया करून उपचार करतील. कंठातील पोकळीमध्ये संसर्ग होण्यासारख्या काही समस्यांवर औषधे दिली जातात आणि सुधारणा होते का ते पाहिले जाते.

!! आंतरराष्ट्रीय आवाज दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभकामना !!

# करुणामय प्रियदर्शी सम्राट अशोक !

**असा विश्वविजेता सम्राट अशोक ज्याला 'चक्रवर्ती' संबोधलं जातं. हे भारतीय इतिहासातील सर्वात महत्त्वाचा लोककल्याणकारी राजा ज्यांनी अखंड भारताचा नव्हे तर भारतासह बहुतांश भाग काबीज केला होता. भारतीय इतिहासात मौर्य साम्राज्याचे महत्व अनन्य साधरण आहे. मौर्य वंशातील सम्राट चंद्रगुप्तांपासुन ते सम्राट अशोकांपर्यंत प्रत्येक राजाने राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्वत्र क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. या राजाच्या परंपरेतील सम्राट अशोकाची इतिहासातील भुमिका अनेकार्थाने महत्वाची ठरली आहे.**

सम्राट अशोक हे जगातील सर्वात महान सम्राट होते. सम्राट अशोकांना भारताच्या इतिहासात ही सर्वात महान व शक्तिशाली सम्राट म्हणून स्थान दिले आहे. प्राचीन भारताच्या परंपरेत चक्रवर्ती सम्राटांची पदवी ज्यांनी जनमानसावर तसेच भारताच्या मोठ्या भूभागावर राज्य केले अशाच महान सम्राटांना दिली जाते. सम्राट अशोकांना 'चक्रवर्ती सम्राट' असे म्हणतात, चक्रवर्ती सम्राट म्हणजे 'सम्राटांचा सम्राट'. आजचा पाकिस्तान, अफगाणिस्तान पूर्वेकडे बांग्लादेश ते दक्षिणेकडे केरळ पर्यंत तसेच नेपाळ, भूतान इराण, ताजिकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांमध्ये अशोकांच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. अत्यंत शूर असे आपल्या आयुष्यात एक ही युद्ध हरले नाहीत असा चक्रवर्ती सम्राट अशोक जगाच्या पाठीवर कोणीही होऊ शकला नाही. सम्राट अशोकाचा जेवढा साम्राज्य विस्तार होता तेवढा हा पूर्ण भारत देश पण नाही आणि जेवढे वर्षे मोर्य शासकांनी या देशावर राज्य केले तेवढे इतर कोणीही करु शकले नाही. त्यांच्या आधीही नाही आणि नंतर ही नाही. सम्राट अशोक सत्य, अहिंसा, प्रेम, सहिष्णूता आणि शाकाहारी जीवनप्रणाली यांचे थोर पुरस्कर्ते होते म्हणूनच एक अतिशय परोपकारी प्रशासक अशीच इतिहासात त्यांची ओळख झाली आहे. अशोकाने आपल्या प्रजाजनांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपल्या शिलालेखातून काही राजाज्ञा दिलेल्या आहेत. अशोकाचे शिलालेख हे मौर्य इतिहासाचे महत्त्वाचे साधन म्हणून ओळखले जाते. सर्वप्रथम ब्रिटिश अभ्यासक जेम्स प्रिन्सेप यांना अशोकाचे शिलालेख सन् १८३७ मध्ये वाचता आले. ते अनेक भाषांचे अभ्यासक होते. अशोकाचे शिलालेख हे ब्राह्ममी, खरोष्टी आणि अरेमाइक या तीन लिपींमध्ये आढळलेले आहेत. त्यातील अनेक अभिलेख हे ब्राम्ही लिपीतील असून ते जेम्स प्रिन्सेप यांनी वाचले, त्यातूनच या चक्रवर्ती सम्राटाच्या आयुष्याची आणि एकूणच मौर्य साम्राज्या विषयीची सखोल माहिती हीअभ्यासकांना मिळालेली आहे अशोकाने आपल्या शिलालेखामध्ये स्वतःला 'देवानाम प्रिय' असे संबोधले आहे. कलिंग युद्ध कलिंग युद्धानंतर त्याचे झालेले मनपरिवर्तन, त्याने स्वीकार केलेल्या बौद्धधर्म, बौद्ध धर्माची तत्त्वे आणि एकूणच धर्मप्रसाराचे कार्य महामात्र यांची नेमणूक या सर्व घटनांचा उल्लेख हा शिलालेखात आलेला आहे. सम्राट अशोक हा या काळातील भारतातील पहिला चक्रवर्ती राजा होय सम्राट याचा अर्थ ज्याचा रथ घोडा चारी दिशांना कुणीही अडवू शकत नाही असा पराक्रमी शासक व विजेता होय. धम्मचक्र परिवर्तन करणारा अशोक हा प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरला आहे इतिहासाला युगानुयुगे त्याची नोंद घ्यावी लागेल मानवी कल्याणासाठी अथक प्रयत्न करणारा प्रजा हीच दक्ष व प्रजा कल्याणकारी शासक म्हणून अनेक इतिहासकारांनी अशोकाच्या कार्याचा गौरव केलेला आहे. हा बौध्द सम्राट म्हणून अशोकाचा असा विश्वास होता की, बौध्द धर्म ह सर्व मानव तसेच प्राणी व वनस्पतीसाठी फायदेशीर आहे म्हणून त्यांनी अनेक स्तूप, सांघाराम, विहार, चैत्य आणि दक्षिण आशियातील बौध्द भिक्कुंचे विहार, मठ बांधले. अशोकवादानुसार त्यांनी बुध्दांच्या अवशेषांवर ८४ हजार स्तुप बांधण्यास आज्ञा दिली आणि ते तयार झालेत, याला इतिहास साक्षीदार आहे. ही काहीशी अतिशयोक्ति असली तरी भारतात बऱ्याच ठिकाणी सम्राट अशोकाच्या कालखंडात स्तुप उभारले गेलेत, हे ऐतिहासिक सत्य आहे. त्यांच्या कार्याचा पुरावा ९० च्या दशकात सन्नतीच्या बौध्द स्थळाचा शोध. जे स्थळ कर्नाटकातील कलबुर्गी जिल्हयात भीमा नदीच्या काठावर. या स्थळाच्या पुनरुज्जीवनाचे काम सध्या हाती घेण्यात आले आहे.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

माधव कोंडविलकर आपले पुस्तक 'देवांचा प्रिय राजा प्रियदर्शी सम्राट अशोक' मध्ये म्हणतात की, ''काही बाबतीत चक्रवर्ती सम्राट अशोकांची तुलना, अलेक्झांडर द ग्रेट, ऑगस्टस सीझर, चंगीजखान, तैमूर, रशियाचा पहिला पीटर किंवा पहिला नेपोलियन यांच्याशी केली जाऊ शकते; पण अलेक्झांडरसारखा सम्राट अशोक अति-महत्त्वाकांक्षी नव्हता. ऑगस्टस सीझरसारखा तो एक आदर्श शासनकर्ता होता; पण आपण हुकूमशहा म्हणून ओळखलं जावं असं जे सीझरला वाटायचं तसं अशोकाला कधीच वाटलं नाही. आपली तशी ओळख व्हावी अशी त्याची कधीच इच्छा नव्हती. अशोक एक सामर्थ्यवान सेनापती होता; पण आपल्या पराक्रमाबद्दल, विजयाबद्दल पहिला नेपोलियन जसा सदैव असंतुष्ट असायचा तसं अशोकाचा बाबतीत नव्हतं. प्रजाजनांनी आपल्यावर प्रेम करावं, असं त्याला मनापासून वाटत असे. मनाचा मोठेपणा किंवा उमदेपणा, मनातला शुद्ध भाव, स्वभावातला प्रामाणिकपणा, स्वतःच्या प्रतिष्ठेबद्दलची किंवा मानमरादा बद्दलच्या स्पष्ट स्वच्छ कल्पना आणि मनातलं सर्वांबद्दलचं प्रेम या अशोकाच्या इतरांपेक्षा वेगळेपणाने जाणवणाऱ्या वैशिष्ट्यांमुळे त्याला गौतम बुद्धांच्या किंवा येशू ख्रिस्ताच्या पंक्तीत नेऊन बसवले होते.''

अशोक हा बिंदुसार या मौर्य सम्राटाचा पुत्र होता. अशोक हा बिंदुसाराच्या अनेक पुत्रांमध्ये शेवटून दुसरा होता. त्यामुळे अशोक मौर्य सम्राट बनेल अशी कोणाची अपेक्षा नव्हती. परंतु अशोकची सेनानी बनण्याची क्षमता वादातीत होती. त्यामुळे साहजिकच इतर भावांचा त्यावरील दुःस्वास वाढला होता. चंद्रगुप्त मौर्याने जेव्हा जैन धर्म स्वीकारून राज्य सुखाचा त्याग केला, त्यावेळेस त्याने तलवार फेकून दिली. ही तलवार शोधून अशोकाने आपल्याजवळच ठेवली. अशोक लहानपणी अतिशय तापट व खोडकर होता. तसेच चांगला शिकारीही होता. त्याला तत्कालीन राजपुत्रांना मिळणारे सर्व शिक्षण मिळाले होते. त्याच्यातील सेनानीचे गुण ओळखून बिंदुसाराने तरुणपणी त्याला अवंतीचा उठाव मोडण्यास पाठवले होते, हे काम त्याने सहज पार पाडले. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये एक महान चक्रवती सम्राट म्हणून अशोकाला मान्यता मिळालेली आहे. तत्कालीन अशोकाचे शिलालेख याची साक्ष देणारे महत्त्वपूर्ण दस्तावेज आहेत.अशोक जसजसा सेनानी म्हणून परिपक्व होत गेला तसतसे त्याच्या भावांचा त्यावरील दुस्वासही वाढत गेला. अशोकने मौर्य सैन्याच्या अनेक तुकड्यांचे यशस्वीपणे नेतृत्व केले होते तसेच त्याच्या एका मागोमागच्या मोहिमांमुळे त्याची राज्यभर कीर्ती दुमदुमू लागली. त्यामुळे त्याच्या भावांना असे वाटले की बिंदुसार अशोकला सम्राट बनण्यास प्राधान्य देतील. बिंदुसारचा ज्येष्ठ पुत्र सुसीम हा अशोकचा दुस्वास करण्यात आघाडीवर होता. सुसीमने अशोकला व्यस्त ठेवण्यासाठी जेथे सुसीम अधिकारी असताना अनेक उठाव झाले होते तेथे, तक्षशिला येथील मोहिमेवर पाठवण्यास सांगितले. अशोक येण्याच्या बातमीने उठाव शमला व अशोकची कीर्ती अजून वाढत गेली. भारताचा बहुतांशी भाग मौर्य अधिपत्याखाली आला तरी अजूनही कलिंग हे स्वतंत्र राज्यच होते. प्राचीन कलिंग ह्या देशात हे आजच्या आधुनिक भारतातील ओडिशा तसेच छत्तीसगड व झारखंड मधील काही भाग येतात. कलिंग युद्धाची कारणे अजून स्पष्ट होत नाहीत. सामाजिक तसेच आर्थिक कारणे ही मुख्य मानली जातात. त्यातील एक प्रमुख कारण म्हणजे कलिंग हे प्रबळ राज्य होते. मौर्यांच्या पूर्वीच्या मोहिमांना फारसे यश लाभले नव्हते. तसेच बाह्य जगाशी व्यवसायवृद्धीसाठी अशोकाला समुद्र किनाऱ्यावर सत्ता हवी होती, ती कलिंगाकडे होती. तिसरे कारण अजूनही स्पष्ट नाही ते म्हणजे कलिंग हा खनिज समृद्ध देश होता. त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी अशोकाने युद्ध केले असावे. कारणे असली तरी युद्ध होण्यासाठी सबळ कारणाची गरज होती. युद्ध साधारणपणे इ.स. पूर्व २६५ च्या सुमारास सुरू झाले. सुसीमच्या एक भावाने कलिंगच्या राजाची मदत घेतली होती. अशोकने हे कारण मानले व कलिंगच्या राजाला शरण येण्यास सांगितले.कलिंगचे युद्ध ही इतिहासातील एक अतिशय वेगळी घटना समजली जाते. बौद्ध धर्माचा जगभर झालेल्या प्रसारास खूप मोठ्या प्रमाणावर अशोकाने केलेले कार्य जबाबदार होते असे बहुतेक इतिहासकार मानतात. अशोकाने पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्माची तिसरी परिषद बोलावली होती बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले. अग्नेय अशिया आणि मध्य आशिया येथील देशांमध्ये त्याने धर्मप्रसारासाठी बौद्ध भिक्खू पाठवले होते त्याने अनेक स्तूप आणि विहार बांधले. त्याचप्रमाणे अशोकाने अनेक सोई निर्माण करण्यावर भर दिला उदाहरणार्थ माणसांना तसेच पशूंना मोफत औषध उपचार मिळावे याची त्यांनी सोय केली होती अनेक नवे रस्ते बांधले, प्रवासामध्ये लोकांना सावली मिळावी यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे लावली, नव्या धर्मशाळा बांधल्या, विहिरी खोदल्या, अशा प्रकारे त्याने अनेक लोकापयोगी आणि कल्याणकारी कार्य केलं होतं. त्याचप्रमाणे बौद्ध धर्माचा मोठा प्रसार आणि प्रचार करण्याचे कामही अशोकाने केले. १९७१ साली सम्राट अशोकाचा एक लघु शिलालेख मध्य प्रदेशातील पांगुरारीया (प्रत्यक्षात नक्तितालाई) या खेड्याजवळ सापडला. या शिलालेखातील मजकुराचे योग्य भाषांतर जर्मनीतील प्राध्यापक हॅरी फाल्क यांनी केल्यानंतर वरील समजुतीला छेद मिळाला असून सम्राट अशोक तरुणपणापासूनच बौद्ध विचारधारा मानणारा होता हे सिद्ध झाले आहे. राजकुमार अशोक उज्जैन प्रांताचा अधिकारी असताना आपल्या मैत्रिणीसोबत (नक्तितालाई) येथे सहलीला आला होता असे या शिलालेखात लिहिलले आढळले आहे. या ठिकाणी बौद्ध भिक्षु संघाचे वास्तव्य होते याचे अनेक पुरावे आजही येथे पहायला मिळतात.अशोकाने आपल्या कारकिर्दीत राज्यात अनेक रुग्णालये व महामार्गाचे जाळे निर्माण केले, रस्त्यांच्या कडेला वृक्षांची लागवड ही अशोकाचीच कल्पना आहे, असे मानतात. आपण सम्राट असल्याच्या अधिकाराचा फायदा त्याने समाजोपयोगी कार्यासाठी केला. त्यानंतर अशोकाला धम्मअशोक असे म्हणू लागले. अशोकाने धम्माची प्रमुख आचारतत्त्वे विशद केली, अहिंसा, सर्व जातिधर्मांबद्दल सहिष्णुता, वडिलधाऱ्या माणसांना मान देणे, संतांना, शिक्षकांना योग्य तो मान देणे, दासांना माणुसकीने वागवणे. अशा आचारतत्त्वांना जगात कोणताही समाज नाकारू शकणार नाही. अशोकाच्या इतिहासकारांनुसार त्याने कलिंगाच्या युद्धानंतर कोणतेही प्रमुख युद्ध छेडले नाही परंतु त्याला शेजारी राष्ट्रांशी ग्रीक राज्ये, चोल साम्राज्य याच्याशी त्याला नेहमी युद्धाची शक्यता वाटत होती. परंतु अशोकाने पूर्वायुष्यातील केलेल्या मोहिमांमुळे व मगधच्या सामर्थ्यामुळे अशोकने बौद्ध धर्म स्वीकारला तरी त्याच्या शेजारी राज्यांनी त्याला छेडण्याचे साहस केले नाही. तसेच बौद्ध धर्म स्वीकारला, अहिंसा हे राष्ट्रीय धोरण बनवले तरी मगधाचे सैनिकी सामर्थ्य अबाधित ठेवले. अशोकाला ग्रीक जगताची माहिती होती असे कळते. तसेच चंद्रगुप्त मौर्याने केलेल्या ग्रीकांविरुद्धच्या मोहिमांमुळे मौर्य साम्राज्याची कीर्ती ग्रीस, इजिप्तपर्यंत पोहोचली होती असे कळते.अवघ्या जगाने गौरवलेला हा सम्राट अशोक मात्र दुर्दैवाने काही काळ भारताच्या विस्मृतीत गेला.

# सिनेअभिनेता सुनिल शेट्टीचा भद्रावती नगरीत सत्कार



**भद्रावती । प्रतिनिधी**

बॉलीवुड सिने अभिनेता सुनिल शेट्टीचा ग्रामगीता शाल व श्रीफळ देवून डॉ. अंकुश आगलावे श्री. गुरूदेव प्रचारक तथा जिल्हाध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा, यांचे व्दारे सत्कार करण्यात आला.

प्रसिध्द भद्रावती नगरीत नुकतेच अभिनेता सुनिल शेट्टींचा रोड शो भाजपा उमेदवार सुधिर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आला होता. या रोड शो मध्ये असंख्य भद्रावती नगरीतील नागरिकांनी हजेरी लावली.

यावेळी डॉ. आगलावे यांनी सुधिरभाऊ विकास पुरूष असून भद्रावती व वरोरा शहरात अनेक विकास कामे केली असल्याचे सुनिल शेट्टींना सांगितले. त्याचबरोबर दिर्घ संवाद साधत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीतेचे महत्व पटवून दिले. सुधिरभाऊ यांनी महाराष्ट्रातील संतांचा वारसा जपत अनेक समाजपयोगी कामे केली आहे. यावेळी असंख्य नागरीक उपस्थित होते.

# निवडणूक कर्तव्यावरील आजारी होमगार्डवर जिल्हा प्रशासनाद्वारे तातडीने उपचार



**गडचिरोली । प्रतिनिधी**

निवडणूक कर्तव्यावर आरमोरी येथे आलेले जळगावचे होमगार्ड रवींद्र अरुण जावळे वय ४९ यांना उच्च रक्तदाबाचा त्रास जाणवू लागल्याने जिल्हा प्रशासनाने याची तातडीने दखल घेत त्यांना नागपूर येथे उपचारार्थ हलविले. त्यांच्यावर ऑरेंज सिटी हॉस्पिटल नागपूर येथे वैद्यकीय उपचार करण्यात आले. त्यांची प्रकृती आता स्थिर आहे.

जिल्हा निवडणूक अधिकारी संजय दैने, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, जिल्हा शल्य चिकित्सक खंडाते यांनी सन्मन्वयाने प्रयत्न करून त्यांना तातडीने वैद्यकीय उपचाराची मदत उपलब्ध करून दिली. जिल्हा शल्य चिकित्सक खंडाते यांनी नागपूर येथे भेट देऊन रुग्णाच्या तब्येतीची पाहणी केली.



वरोरा:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे सामाजिक सुधारणा, समता व न्यायाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मत डॉ. अंकुश आगलावे, श्री. गुरूदेव प्रचारक वरोरा यांनी व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित वरोरा येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पन करून विन्रम अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. आगलावे यांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात महिलांना शिक्षणाचा आणि स्वावलंबी जीवणासाठी नौकरी करण्याचा अधिकार दिला. यावेळी गुरूदेव सेवा प्रचारक मंडळाचे प्रचारक उपस्थित होते..

# श्री संत गजानन महाराज यांनी भक्तिमार्गाने समाजाला दिशा दिली-आ.किशोर जोरगेवार

## दाताडा येथे नवनिर्मित श्री संत गजानन महाराज मंदिर लोकार्पण व प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री संत गजानन महाराज यांनी लोकांना भक्तिमार्गाचे महत्त्व पटवून सांगितले. ते सिद्धयोगी पुरुष होते. अद्वैत ब्रह्माचा सिद्धांत महाराजांच्या गण गण गणात बोते या सिद्धमंत्रात व्यक्त झाला आहे. ते एक महान संत होते. त्यांनी भक्तीमार्गाने समाजाला दिशा देण्याचे काम केले. आज त्यांच्या मंदिराचे लोकार्पण व प्राणप्रतिष्ठापणा करतांना आनंद होत असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

स्व. कु. साक्षी संजय बुरघाटे यांच्या स्मुतीप्रित्यर्थ दाताडा रोड वरील सावित्रीबाई फुले उद्याण येथे श्री. संत गजानन महाराज मंदिराचे बांधकाम करण्यात आले आहे. आज सोमवारी मंदिर लोकार्पण आणि प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी संजय बुरघाटे, अशोक मत्ते, श्याम घोपटे, माळी महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अरुण तिखे, चंद्रहारपाटील गोहोकार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जोरगेवार म्हणाले कि, गजानन महाराज हे अत्यंत परमोच्च स्थितीला पोहोचलेले ब्रह्मवेत्ते महान संत होते. भक्तांचा उद्धार करण्याची त्यांची स्वतःचीच एक विशिष्ट अशी शैली होती. काहीच न बोलता ते सर्व काही बोलून जात असा त्यांच्या भक्तांचा अनुभव होता. भक्तांवर असीम अशा कृपेचे छत्र धरून ते भक्तांच्या हृदयात घर करत असे. ''गण गण गणात बोते,'' हा त्यांचा आवडता मंत्र होता. ज्याचा ते अखंड ते जप करीत. या मंत्राशिवाय ते उभ्या आयुष्यात काहीही बोलले नाहीत. त्यांचे आज मंदिर उभे झाले आहे. हे एक मन शांती चे केंद्र ठरणार आहे. संजय बुरघाटे यांनी भाविकासांठी साकारलेल्या या मंदिरातुन भक्तीचा संचार होणार आहे. समाजातील दृष्ट शक्तीचा नाश होऊन सकारात्मकतेचा वास या परिसरात निर्माण होणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची व श्री गजानन महाराज यांच्या भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## एस.एन.डी.टी.महीला विद्यापीठ मुंबई चे बल्लारपूर आवार येथे 'आर्थिक साक्षरता' या विषयावर व्याख्यान पार पडले





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एस .एन .डी. टी. महीला विद्यापिठ मुंबई, चे महषी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल बल्लारपूर येथे आर्थिक साक्षरता या विषयावर व्याख्यान पार पडले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सेबी. स्मार्ट प्रशिक्षक श्रीमती मीली पॉल प्रामुख्याने उपस्थितीत होत्या. शेअर बाजारातील विविध क्षेत्रात पैसे कसे गुंतवणूक करावी जेणेकरून परतावा जास्तीत जास्त मिळेल यावर त्यांनी उत्कृष्ठ मार्गदर्शन केले. इक्विटी शेअर्स, म्युच्युअल फंड, एस. आई. पी., आयपिओ याबाबत सुध्दा महत्वाचे मार्गदर्शन केले. सोबतच डी.मार्टचे उदाहरन देऊन त्यांमध्ये गुंतवणूक केल्यास पैसे कीती लवकर वाढतो हे सांगीतले, गुंतवणूके बद्दल जागरूक कसे राहावे आणि छोटे छोटे गुंतवणूक कशी करावी याबद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक वेदानंद अलमस्त यांनी केले सोबतच. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण एस. एन. डी. टी. महीला विद्यापीठ मुंबई चे महर्षी कर्वे महीला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी केले या कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कुलसचिव डॉ. बाळू राठोड विशेषत्वाने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. खुशबु जोसेफ यांनी केले तसेच आभार प्रदर्शन प्रा .शितल बिल्लोरे यांनी केले. या प्रसंगी प्रा. अश्विनी वाणी, प्रा. नेहा गिरडकर, प्रा. श्रृतिका राऊत आणि सर्व विद्यार्थीनी उपस्थित होते. सोबतच सौ. वैशाली बोमकंटीवार, श्री. आशिष नुगुरवार, सौ. ममता भेंडे, स्नेहा लोहे, मनोज अर्गेलवार उपस्थितीत होते.

## सावरगाव येथील लोक विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

दि रुलर एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील लोक विद्यालय शाळेत रविवारी दि.१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या आनंदात साजरी करण्यात आली.

या जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोक विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम कामडी होते.तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ट शिक्षक नरेंद्र घोडमारे, सहायक शिक्षक राजू आमले, उद्धव देशमुख,पदमाकर निखारे,शैलेश खंडाळे,उत्तम बोरकर,सहायक शिक्षिका संगीता ढोके,सहायक शिक्षक बदखल, श्रीकांत बोरकर, शिक्षका गीता , शिवणकर आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.व डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक पुरुषोत्तम कामडी,सहायक शिक्षक उत्तम बोरकर, सहायक शिक्षिका संगीता ढोके यांनी विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेव आंबेडकर यांच्या जीवनावर मार्गदर्शन केले.

## बाबासाहेबांच्या जयंती निमित्ताने मॅजिकच्या नवीन अभ्यासिकेचा शुभारंभ

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील डॉ. रमेशकुमार गजबे शिक्षा संकुल येथे सुरू असलेल्या मॅजिक उपक्रमांतर्गत नवीन अभ्यासिकेचा शुभारंभ १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्ताने करण्यात आला.

याप्रसंगी मॅजिकचे माजी विद्यार्थी चंद्रशेखर सावसाकडे विशेष शिक्षक दिल्ली व भूषण ननावरे वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँक आणि मॅजिकचे विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.. तसेच उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

ब्राईटएज फाउंडेशन भिवापूरच्या माध्यमातून सुरू असलेल्या मॅजिक उपक्रमांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे मोफत मार्गदर्शन, वाचनालय, भोजन व निवास उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच रक्षक उपक्रमांतर्गत पोलीस भरतीचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. सद्यस्थितीत ५५ विद्यार्थी व विद्यार्थिनी या मॅजिक अभ्यासिकेचा लाभ घेत आहे. या अभ्यासिकेची क्षमता फक्त ५० विद्यार्थ्यांची होती. आता ती वाढवून १०० करण्यात आली आहे. यामुळे आता भिसी परिसरातील होतकरू विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेचा लाभ घेता येणार आहे. तरी परिसरातील विद्यार्थ्यांनी मॅजिक अभ्यासिकेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मॅजिक परीवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



ही अभ्यासिका लोकवर्गणीतून उभी करण्यात आली असून या अभ्यासिकेला लागलेला ६० हजार रुपयाचा खर्च समाजातील दानशूर व्यक्तींनी केला. त्यामध्ये ज्ञानेश्वर चौके, पराग दोडके, शीतल राने, जितेंद्र नारनवरे, ज्योती श्रीरामे, अभिषेक घोडमारे, अतुल वाकडे, धनंजय गुडदे, गोविंदराव चौधरी, भाऊराव श्रीरामे, रमाकांत गजबे, हितेश नागोसे, गुरुदेव नन्नवरे, शेषराव नारनवरे, विजय ननावरे, सुधाकर श्रीरामे, राजेंद्र जांबुडे, दिगंबर गरमडे, नागनाथ दडमल, मनोज नारनवरे, रवींद्र शामराव धारणे, ज्ञानदेव प्रकाश चौके व इतर देणगीदारांचा समावेश आहे. या अभ्यासिकेच्या बांधणीचे काम पेटगाव येथील किरणकुमार मगरे यांनी मोफत करून दिले. या अभ्यासिकेसाठी लागणारी इमारत डॉ रमेशकुमार गजबे यांनी उपलब्ध करून दिली. शिक्षा संकुलमधील वातावरणातील अल्हाददायक व शांत असून अभ्यासासाठी अतिशय अनुकूल आहे. त्यामुळे या परिसरातील विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेचा निश्चितच लाभ होईल. अशी भावना शुभारंभ कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त करून दाखवली.

## हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील समुद्रपूर तालुक्यातील शेगाव (गोटाडे) येथील शेकडो महिला कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

### आ. समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला



**समुद्रपूर । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते तसेच महीला आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत. दि. १३ रोजी हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील समुद्रपूर तालुक्यातील शेगाव (गोटाडे ) येथील शेकडो महिला कार्यकर्त्यांनी

आ. समीर कुणावार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन ६दि.१३ एप्रिल २०२४ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले. याप्रसंगी प्रामुख्याने वंदनाबाई चौधरी , पुष्पाबाई वैद्य, सरस्वती बेलेकर , संगीताबाई चौधरी, मीराबाई लाखे, चंद्रकलाबाई मेश्राम ,ताराबाई बेलेकर ,वर्षाताई बेलेकर, मंजुषा खीरडकर, माधुरी वराडकर, वंदनाताई चौधरी, मंगलाताई चौधरी, शशिकला पोटकर, गीता धुर्वे ,रामदास धुर्वे ईत्यादी महिला व पुरुष कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आ. समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे वेळी आ. समीर कुणावार यांचेसह भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव रवी उपासे, ओबीसी मोर्चा भाजपाचे शहराध्यक्ष अनिल चाफले, माजी नगरसेविका वंदनाताई कामडी, समाजसेवक देवा पडोळे, राजू माडेवार, ओबीसी मोर्चा भाजपा विधानसभा प्रमुख विवेक तडस, मुन्ना त्रिवेदी, दिपालीताई लाखे, बंडूभाऊ लाखे, रुपेश सौदरकर इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

## समता सैनिक दल जगण्याचा उद्देश बहाल करते-मार्शल मदुरंध

**पुलगाव । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वात आधी समता सैनिक दल या संघटनेची निर्मिती केली आणि समता सैनिक दलाच्या प्रत्येक सैनिकात शिस्त स्वावलंबन आणि आत्मसन्मान रुजवला. जगण्याचे उद्देश स्पष्ट करत कल्याणकारी राष्ट्र निर्माणासाठी आत्मबलिदान या सैनिकांमध्ये संस्कारीत केला. असे मानवी मूल्यांनी संस्कारीत राष्ट्राचे सैनिक मोठ्या प्रमाणात घडवण्यासाठी आपण घर तिथे सैनिक हे अभियान राबवले पाहिजे.असे प्रतिपादन समता सैनिक दल द्वारा संचालित संडे स्कूल या प्रकल्पाचे राज्य समन्वयक मार्शल मधुरंध यांनी पथसंचलन समारोपीय कार्यक्रमात केले.समता सैनिक दलाचे वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंती निमित्ताने बाबासाहेबांना १०० सैनिकांनी पथसंचलन करून अभिवादन केले. समता सैनिक दलाचे वतीने नाचणगाव ते पुलगाव या पथसंचलनात प्रशिक्षक व राज्य समन्वयक मार्शल मधुरंध व मार्शल आकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली पथसंचलन करण्यात आले. नाचणगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पथसंचलन रमाई बुद्ध विहार नाचणगाव,



भीम विहार, जेतवन बुद्ध विहार कुर्ला, नगरपालिका पुलगाव समोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. शेवटी प्रेरणा भूमी बुद्ध विहार येथे पथसंचलनाची सांगता झाली. यावेळी समता सैनिक दलाचे केन्द्र संघटक मार्शल संजय ओरके, राज्य महासचिव मार्शल शशिकांत, धर्मेंद्र अंबादे, राजेंद्र गणवीर सुशील बांगर, प्रफुल्ल ढेपे, अमित उमरे, सुनील रामटेके, आलोक रामटेके, गौतम अढावू, कराटे प्रशिक्षक खंडाळकर व समता सैनिक दलाचे मार्शल उपस्थित होते.

## महात्मा ज्योतीबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी




**वरोरा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय सूर्ला वरोरा येथे महात्मा ज्योतीबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दिनकर गुरनूले यांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले .

तसेच प्रमुख मार्गदर्शक प्रा.विनोद कोरडे तसेच प्रा. भारती पाटील प्रा. मनोज खंडाळकर हे उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी माहेश्वरी कडूकर तर आभार प्रदर्शन सानिया सलामे यांनी केले. तसेच तुषार कडू, हर्षद ढवस ,रमेश जीवतोडे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

## विश्व होमिओपॅथी दिवस साजरा



**वर्धा । प्रतिनिधी**

होमिओपॅथी चे जनक डॉ सॅम्युअल हॅनेमॅन यांची जयंती व विश्व होमिओपॅथी दिवस, होमिओपॅथिक मेडिकल असोसिएशन ऑफ इंडिया, वर्धा शाखा तर्फे साजरा करण्यात आला.

या प्रसंगी एक दिवसीय चर्चासत्र दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था येथे ठेवण्यात आले. वक्ते म्हणून डॉ इंद्रजित खांडेकर यांनी उपस्थित डॉक्टरांना प्रॅक्टिस मध्ये न्यायवैद्यक शास्त्राचे महत्व समजून सांगितले. डॉ कपिल भाटी यांनी होमिओपॅथी उपचाराने असाध्य आजार कसे बरे होऊ शकतात यावर अनुभव सांगितला.

या प्रसंगी कार्यक्रम चे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ अभ्युदय मेघे यांनी सर्व पॅथी मिळून(हॉलिस्टिक) रुग्ण कसा बरा करता येईल यावर भर दिला.कार्यक्रमा चे प्रास्तविक डॉ अनिल लोणारे यांनी केले, तर संचालन डॉ शुभांगी निमकर यांनी केले, तसेच आभार डॉ किशोर फाले यांनी मानले.या प्रसंगी होमिओपॅथिक मेडिकल असोसिएशन ऑफ इंडिया, पदाधिकारी डॉ दत्ता कुंभारे, डॉ मिलिंद वासेकर, डॉ आनंद गाढवकर, डॉ प्रशांत खातदेव, डॉ विनय डाहाके, डॉ सम्राट तोटे, डॉ गजानन मलमे, डॉ मकरंद चुंने, डॉ अभिनव लोणारे, डॉ सुचित्रा कुर्वे, डॉ रेणुका गाढवकर, डॉ स्नेहल ताल्हान उपस्थित होते.

## मुल येथे व्यापारी मंडळ, सामाजिक संस्थांच्या बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद

# काँग्रेस देशाचा विकास करूच शकत नाही लोकसभा उमेदवार ना.मुनगंटीवार यांची टीका







**मुल । प्रतिनिधी**

काँग्रेसने कितीही प्रयत्न केले तरी ते देशाचा विकास करू शकत नाहीत. देशाचा विकास करण्याची ताकद फक्त मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींजी मध्ये आहे. काँग्रेसला फक्त आणि फक्त दुष्ट प्रचार करता येते, देशाचा विकास करता येत नाही, अशी घणाघाती टीका चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), पिरीपा (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

मुल शहरातील कन्नमवार सभागृहात व्यापारी मंडळ व शहरातील विविध सामाजिक संस्थांची बैठक पार पडली. या बैठकीला उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, र पासून सुरू होणाऱ्या अक्षराने रावणाच्या अत्याचाराला र पासून सुरू होणाऱ्या रामाने संपविले आहे. क अक्षरापासून सुरू होणाऱ्या कंसाच्या अत्याचाराला क पासून सुरू होणाऱ्या कृष्णाने संपवीले आहे, हा इतिहास आहे. त्यामुळे आता क अक्षरापासून सुरू होणाऱ्या काँग्रेसला महायुतीचे क अक्षरापासून सुरू होणारे कार्यकर्ते संपविणार आहेत, अशी भावना ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. कार्यकर्ता बैठकीला जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष संध्या गुरनुले, माजी नगराध्यक्ष विजय चिमड्यालवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे मंगेश पोटवार, शिवसेना आघाडीच्या महिला अध्यक्ष भारती राखडे, अर्चना सहारे, शिवसेनेचे शहर अध्यक्ष रत्नमाला भोयर, नंदकिशोर रणदिवे, प्रभाकर भोयर, चंदू मारगोनवार, विशाल नागुलवार, मुकेश गेडाम, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मोती टहलीयानी, यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नांदगाव ग्रामपंचायत चे उपसरपंच सागर देऊळकर यांनी भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्ते आणी पदाधिकाऱ्यांकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा आणी भारताचे संविधान भेट देऊन त्यांचा स्वागत करण्यात आला आणी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मोठया विजयासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस चे तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार, शहर अध्यक्ष आकाश येसनकर,ओबीसी आघाडीचे अध्यक्ष वासुदेव पिपरे, युवक तालुका अध्यक्ष रोहित कामडे, तालुका सचिव प्रशांत मेश्राम, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष आशु खान महिला तालुका अध्यक्ष संगीता गेडाम, तालुका उपाध्यक्ष महेंद्र कोडापे, वैद्यकीय मदत कक्षाचे तालुका अध्यक्ष आनंदरावं गोहने,ग्रामपंचायत सदस्य दिनेशजी वंजारी,सामाजिक न्याय तालुका अध्यक्ष गुड्डू निमगडे,महिला शहर अध्यक्ष धाराताई मेश्राम,सुवर्णा रामटेके,महिला कार्यकर्त्या शीतल वाडगुरे, मालाताई शेंडे, किसन गुरुनुले,रज्जत कुकुडे, सूरज गिरडकर,पंकज जवळे,भावेश रामटेके तसेच तालुक्यातील आणी शहरातील कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

### दिवंगत खासदारांनी शब्द पाळला नाही : मंगेश पोटवार

मुल तालुक्यात काँग्रेस पक्षाचे खासदार बाळू धानोरकर यांनी सभा घेऊन खासदार मानधनातून शेतकऱ्यांचा पिक विमा काढण्याचे आश्वासन आम्हाला दिले होते. त्यासभेचे प्रास्ताविक मी केले होते. आश्वासनांतर त्यांना आम्ही निवडून दिले होते. विजयी झाल्यावर त्यांनी आपल्या मानधनातून पिक विमा काढला नाही, दिलेला शब्द पाळला नाही. आम्हाला काँग्रेस पक्षाच्या उमेदवारावर विश्वास नाही, परंतु आता आम्हाला सुधीर भाऊंसारख्या चंद्रपूरच्या हिऱ्याला संसदेत पाठवायचे आहे. सुधीरभाऊ दिलेला प्रत्येक शब्द पाळतात. संपूर्ण देशामध्ये सर्वांत जास्त मतांनी आपण सर्व विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्ष एकत्र येऊन सुधीरभाऊंना निवडून दिले पाहिजे तरच या लोकसभा क्षेत्राचा कायापालट होईल, अशी प्रामाणिक भावना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मंगेश पोटवार यांनी व्यक्त केली.

### सुधीरभाऊ गाजवतील देशाची संसद : संध्या गुरनुले

बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचा सुधीरभाऊंनी कायापालट केला आहे. जगभरात आपल्या चंद्रपूर जिल्ह्याचे नाव त्यांनी झळकविले आहे. त्यांनी राज्य सरकारमध्ये आपल्या जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडून न्याय मिळवून दिला आहे. मग महिला बचतगटांचे प्रश्न, शेतीचे प्रश्न, बेरोजगारांचे प्रश्न असो त्यांनी विधिमंडळात आवाज उठवून न्याय दिला आहे. आता त्यांना देशाच्या संसदेमध्ये पाठवून चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचा आवाज बुलंद करायचा आहे. आपण त्यांना या निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त मतांनी विजयी केले तर संसदेमध्ये आपला जिल्ह्याचा आवाज गाजवतील, असे प्रतिपादन चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष संध्या गुरनुले यांनी कार्यकर्ता बैठकीत केले.

# चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत धनगर समाजाचा ना.मुनगंटीवार यांना जाहीर पाठींबा

## सुधीरभाऊ धनगर समाजाच्या प्रश्नाची जाण असणारा नेता–डॉ.विकास महात्मे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत धनगर समाजाने चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), पिरीपा (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांना समर्थन देऊन जाहीर पाठींबा दिला आहे. धनगर समाज संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने नुकतीच त्यांची भेट घेऊन चर्चा केली. धनगर समाजाचे प्रश्न, समस्या, आरक्षणासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार, अशी ग्वाही यावेळी ना. मुनगंटीवार यांनी शिष्टमंडळाला दिली आहे.



चंद्रपूर लोकसभा क्षेत्रात धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने वास्तव्यास आहे. या समाजाच्या अडचणी व समस्यां बाबत धनगर समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार, पद्मश्री डॉ. विकास महात्मे, प्रदेश अध्यक्ष अनंत बोनसोडे, प्रदेश सचिव ज्ञानेश्वर परदेशी यांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. लोकसभा निवडणुकीत संपूर्ण धनगर समाज बांधवांचा आपणास जाहीर पाठींबा देत असून आमच्या समाजाच्या अडचणीबाबत माहिती दिली. भटक्या जमाती की मध्ये घुसखोरी करून बोगस जात प्रमाणपत्र काढून नोकरी लाटणाऱ्या व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करणे, चंद्रपूर - गडचिरोली जिल्ह्यातील मेंढपाळांना शेळी-मेंढे चराईसाठी कुरण उपलब्ध मोफत पासेस मिळणे, शेळी-मेंढी करिता मोफत औषधी, लसीकरण, विमा कवच मिळणे, धनगर जमातीसाठी त्वरित घरकुल योजनाला अंमलबजावणी करणे, जिल्हा स्तरावर मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह उपलब्ध करून देणे, जिल्ह्याच्या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह बांधणे, धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे अश्या मागण्या त्यांनी निवेदनात केल्या आहेत. त्यावर आपण शासन दरबारी धनगर समाजाचे प्रश्न, अडचणी बाबत शासन स्तरावर पाठपुरावा करू, असे आश्वासन ना. मुनगंटीवार यांनी शिष्ट मंडळाला दिले. भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांना धनगर समाजाच्या प्रश्नांची जाणीव आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात धनगर समाजाचे अनेक प्रश्न देखील मार्गी लावले आहेत. देशाच्या संसदेत धनगर समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी असा नेता निवडून देणे काळाची गरज आहे. या लोकसभा निवडणुकीत त्यांना सर्वात जास्त मतांनी निवडून देण्यासाठी धनगर समाज बांधव त्यांच्या पाठीशी उभा राहील. सर्व समाज बांधवांनी त्यांचा प्रचार करण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहन धनगर समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार, पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांनी केले आहे.

# गोंडपिपरी तालुक्यातील नाभिक समाज संघटनेचा भाजप उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांना पाठिंबा



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत नाभिक समाज तालुका गोंडपिपरी यांनी चंद्रपूर - वणी - आणि लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना , राष्ट्रवादी काँग्रेस , रिपाई (आठवले गट ) , पीरिपा (कवाडे गट )

, रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना . सुधीर मुनगंटीवार यांना समर्थन देऊन जाहीर पाठिंबा दिला आहे . नाभिक समाज संघटना गोंडपिपरी तालुक्याच्या वतीने नुकतेच भाजपा कार्यालय गोंडपिपरी येथे पाठिंब्याचे पत्र दिले . यावेळी भाजपा जेष्ठ नेते सुहास माडूरवार , माजी जिल्हापरिषद सदस्य अमर बोडलावार, भाजपा तालुका अध्यक्ष बबन निकोडे , भाजपा नेते दीपक बोनगीलवार, नाभिक समाज संघटना तालुका गोंडपिपरी चे अध्यक्ष मनोज कोप्पावार, उपाध्यक्ष संतोष कानमपल्लीवार , सचिव सुधीर रामगिरवार, कोषाध्यक्ष संजू गोविंदवार , व्यवसायिक अध्यक्ष प्रकाश सूत्रपवार , अरुणा जांभुळकर यांच्या सह समाजातील अनेक महिला पुरुष उपस्थित होते .

# मतदारांनो ! तुम्ही सुध्दा जिंकू शकता बाईक, रेसींग सायकल आणि न्ड्राईड मोबाईल

## बस्स....मतदान करून सेल्फी अपलोड करा;जिल्हा प्रशासनाच्या वतीने आकर्षक बक्षीस जिंका स्पर्धा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशाच्या प्रगतीसाठी, ध्येयधोरणे ठरविण्यासाठी मतदान करून आपला सहभाग लोकशाही प्रक्रियेमध्ये नोंदविणे अत्यंत महत्वाचे आहे. १३ - चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक १९ एप्रिल २०२४ रोजी २११८ मतदान केंद्रावर होणार असून सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदानाची वेळ आहे. या निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करून लोकशाही प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे, या उद्देशाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'तुमचे मत द्या आणि लकी ड्रॉ मध्ये आकर्षक बक्षिसे जिंका' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर मतदारांनो, ही स्पर्धा तुमच्यासाठी आहे. बस्स.... १९ एप्रिल रोजी मतदान करून सेल्फी अपलोड करा आणि जिंका बाईक, रेसींग सायकल आणि न्ड्राईड फोन.

१९ एप्रिल रोजी मतदान केल्यानंतर मतदारांनी शाई लावलेले बोट दाखवत मतदान केंद्रासमोर सेल्फी क्लिक करावा व आपला फोटो अपलोड करून या स्पर्धेत सहभागी व्हावे. फोटो अपलोड करण्यासाठीची लिंक / क्यूआर कोड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://chanda.nic.in/en/divisions/collector-office-contact-details/ तसेच जिल्हा परिषदेच्या https://zpchandrapur.co.in/ वेबसाईटवर उपलब्ध आहे.

पहिल्या तीन क्रमांकाचे आकर्षक बक्षीसे : प्रथम बक्षीस १ लक्ष ६० हजार रुपये किंमतीची टीव्हीएस कंपनीची अपाची आरटीआर - १४०, ४ व्ही बाईक, (आरटीओ आणि विमा खर्च समाविष्ट). सद्यस्थितीत विसापूर येथील श्रध्देय श्री. अटलबिहारी वाजपेयी बोटॅनिकल गार्डनमध्ये ही बाइक प्रदर्शित करण्यात आली आहे. इतर बक्षीसांमध्ये ९१ मिराकी ई-सायकल ( किंमत ३५ हजार) आणि सॅमसंग न्ड्राईड फोन (किंमत २० हजार )पात्रता : १) चंद्रपूर जिल्ह्यातील नोंदणीकृत मतदार असणे आवश्यक आहे. २) १९ एप्रिल २०२४ रोजी यशस्वीरित्या मतदान करणे आवश्यक आहे. अटी व शर्ती : १) इच्छुकांनी मतदानाच्या दिवशी सेल्फी घ्यावा आणि तो दिलेल्या गुगल फॉर्मवर अपलोड करावा. येथे दिलेला क्यूआर कोड देखील त्यात प्रवेश करण्यासाठी स्कॅन केला जाऊ शकतो. २) सेल्फी हा स्पष्ट आणि फिल्टर न केलेला कलर फोटो असावा. ३) सेल्फीमध्ये स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व्यक्तिचा चेहरा, त्याचे/तिचे बोट अमिट शाईने (मतदान केल्यानंतर चिन्हांकित) दाखवत मतदान केंद्रासमोर सेल्फी क्लिक करा. ४) सेल्फी २० एप्रिल ११.५९ पीएम पूर्वी अपलोड करणे आवश्यक आहे. अंतिम मुदतीनंतर प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत. ५) २० एप्रिल रोजी एक संगणकावर आधारित अल्गोरिदमिक लकी ड्रॉ काढण्यात येईल, जेणेकरून विजेते आणि चार प्रतीक्षा यादीतील उमेदवार घोषित केले जातील. ६) निवडून आलेल्या विजेत्याला त्याचे फोटो ओळखपत्र, व्होटर स्लिप आणि पॅन कार्ड सादर करण्यासाठी २३ एप्रिल, संध्याकाळी ५ वाजेपर्यंत तीन दिवसांचा वेळ दिला जाईल. ७) असे करण्यात अयशस्वी झाल्यास प्रतीक्षा यादीतील पुढील उमेदवाराला संधी दिली जाईल. हे सहभागी ठरू शकतात अपात्र : १) सेल्फीमध्ये चेहरा अस्पष्ट आहे किंवा बोटावर शाई आहे किंवा मतदान केंद्र दिसत नाही. २) आवश्यक कागदपत्रे तीन दिवसांत सादर करण्यात अयशस्वी. ३) गुगल फॉर्ममध्ये सर्व तपशील भरलेले नाहीत. ४) चंद्रपूर मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणीकृत केलेली नाही. ५) कोणत्याही प्रकारच्या निवडणुकीत किंवा कायदेशीर गैरव्यवहारात भाग घेतल्याचे आढळण्यात आले. तर मतदारांनो, या स्पर्धेत जास्तीत जास्त मतदारांनी सहभागी होऊन लोकशाही प्रक्रियेला बळकट करा आणि बक्षीसे जिंका, असे आवाहन जिल्हा निवडणूक आधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती जेतवन बुद्ध विहार मालेवाडा येथे साजरी



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार, मालेवाडा येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गावातिल मुख्य रस्त्याने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महाकारुनिक तथागत भगवान गौतम बुद्ध, यांच्या प्रतिमांसह मिरवणूक (रॅली) काढण्यात आली.

जय भीम चा जयघोष करत डीजे च्या तालावर थिरकत विहाराचे प्रांगणात मिरवणुकीची सांगता करण्यात आली.त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महाकारुनिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. व सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश आनंदराव रामटेके(अध्यक्ष, बौध्द पंच कमेटी) व प्रमुख पाहुणे ग्रा. पं. मालेवाडा सरपंच कालिदास भोयर, उपसरपंच शंकर दडमल, ग्रा.पं.सदस्य प्रमोद जीवतोडे, पोलिस पाटील हेमंतकुमार गजभिये, ज्येष्ठ मार्गदर्शक डुडाराम शेंडे, काशिनाथ गजभिये, नथूजी मेश्राम, चरणदास पोईनकर व इतर मान्यवर उपस्थित होते. . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिक रामटेके यांनी केले. व आभार प्रदर्शन निलेश मेश्राम यांनी मानले. सामाजिक सहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली, यात तरुणांनी उल्लेखनीय योगदान केल. याप्रसंगी समस्त बौध्दजन तथा गावकरी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .